दैनिक
# अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
वर्ष : ०४, अंक : २१०
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com
बुलडाणा, बुधवार, दि.१२ मार्च २०२५




# अहिल्यानगर जिल्ह्यात पिण्याच्या पाण्यासाठी टँकर सुरू
## सावधान ! उन्हाची तीव्रता वाढली...

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.११, अहिल्यानगर :** जिल्ह्यातील मोठ्या व मध्यम पाणीप्रकल्पामधून पर्याप्त पाणीसाठा असला तरी लाभक्षेत्रात टंचाईच्या झळया सुरू झाल्या आहेत. उन्हाची तीव्रता वाढू लागली तशी जिल्ह्यात पिण्याच्या पाण्यासाठी टँकर सुरू करावे लागले आहेत. सध्या जिल्ह्यातील पाच गावातील १० हजार ९४६ लोकवस्तीला ४ टँकरच्या २१ खेपा करून पाणीपुरवठा सुरू करण्यात आला आहे.



गेल्या वर्षीच्या उन्हाळ्यात जिल्ह्यात एकूण ३४८ टँकरमार्फत सुमारे ६.५ लाख रहिवाशांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा सुरू होता. दरवर्षी उन्हाच्या झळया वाढू लागल्या की जिल्ह्याच्या काही भागात टँकर सुरू करावे लागतात. धरणात पर्याप्त पाणीसाठा असला तरीही टँकर सुरू करण्याची वेळ येते. यंदाही तीच परिस्थिती ओढवली आहे.

त्यानुसार संगमनेर तालुक्यातील सायखिंडी, पिंपळगाव देपा, खंडेरायवाडी, दरेवाडी व वरवंडी या पाच गावात १० हजार ९४६ रहिवाशांना चार टँकरच्या २१ खेपा सुरू करून पिण्याच्या पाण्याचा पुरवठा सुरु झाला आहे. जिल्हा प्रशासनाने यंदा आगामी नऊ महिन्याच्या कालावधीसाठी सुमारे ४१ कोटी रुपये खर्चाचा संभाव्य टंचाई निवारण कृती आराखडा तयार केला आहे.

या आराखड्यानुसार जिल्ह्यात ६४३ गावे व २४१५ वाड्यावस्त्यांना संभाव्य पाणीटंचाई जाणवू शकते. गेल्या वर्षी जिल्हा प्रशासनाने ८४ कोटी रुपये खर्चाचा आराखडा टंचाई निवारण आराखडा तयार केला होता. मात्र प्रत्यक्षात २९ कोटी रुपये खर्च झाला. यापूर्वी सन २०१८ मध्ये जिल्ह्याला टँकरने पाणीपुरवठा करणाऱ्या टँकरची संख्या १ हजारावर पोचली होती. धरणामध्ये पाणीसाठा शिल्लक असल्यामुळे यंदा टँकर सुरू करण्याची वेळ उशिरा आली. गेल्या वर्षी फेब्रुवारीमध्येच टँकर सुरू करावे लागले होते. गेल्या वर्षी मे २०२४ अखेरीस ३४८ टँकरच्या माध्यमातून सुमारे ६.५ लाख लोकसंख्येला पाणीपुरवठा करावा लागला होता. त्यावेळी ३२३ गावे व १७०८ वाड्यावस्त्यांना पाणीपुरवठा केला जात होता. जिल्ह्यात भंडारदरा, मुळा व निळवंडे असे तीन मोठी धरणे आहेत तर आढळा, मांडओहळ, पारगाव घाटशीळ, सीना, खैरी, विसापूर अशी सहा मध्यम प्रकल्प आहेत. त्यातील सध्याचा पाणीसाठा पुढीलप्रमाणे (कंसातील आकडा गेल्यावर्षीचा)- भंडारदरा ७९ टक्के (४८ टक्के), मुळा ५० (६२.६६), निळवंडे ४०.८८ (३३.३४), आढळा ६९.४३ (६९.४३), मांडओहळ ३०.३३ (१४.२४), पारगाव घाटशीळ १९.९२ (०.०६) सीना ५४.७९ (३०.३८), खैरी ५०.६५ (१९.०२) व विसापूर ५२.५३ टक्के ( ३५.९३ टक्के).

# शिर्डी पुन्हा हादरली! पोटच्या पोराने केला बापाचा खुन

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.११, राहाता :** महिनाभरापूर्वी साईबाबा संस्थांच्या दोन कर्मचाऱ्यांना हत्या करण्यात आली होती. या दुहेरी हत्याकांडाने संपूर्ण महाराष्ट्र हादरला असतानाच आता पुन्हा शिर्डीत घरगुती वादातून पोटच्या मुलानेच वडिलांची हत्या केल्याची धक्कादायक घटना शिर्डी मध्ये ६ मार्च रोजी रात्री ८ वाजेच्या सुमारास घडली होती.

शवविच्छेदन अहवाल आल्यानंतर मुलाविरुद्ध शिर्डी पोलिस ठाण्यात खुनाचा गुन्हा आज मंगळवारी दाखल करण्यात आला. या घटनेमुळे शिर्डीत एकाच खळबळ उडाली आहे.दरम्यान आरोपी शुभम गोंदकर यास येथील न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्यास १५ मार्च पर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे.

दत्तात्रय शंकर गोंदकर (वय ५४ रा. शिर्डी) असे मयताचे नाव आहे. शुभम गोंदकर (वय २९) असे आरोपी मुलाचे नाव आहे. शिर्डी मध्ये ६ मार्च रोजी रात्री ८ वाजेच्या सुमारास सदरची घटना घडली होती. मयत दत्तात्रय शंकर गोंदकर हे त्यांच्याच घरी त्यांची पत्नी संजीवनी गोंदकर हिच्याबरोबर काहीतरी कारणाने झटापट करत असताना मुलगा शुभम गोंदकर यांनी वडील दत्तात्रय गोंदकर यांना पाईपने मारहाण करत भिंतीवर ढकलून दिले .त्यात ते गंभीर जखमी झाले. त्यांना उपचारासाठी शिर्डी येथील




रुग्णालयात दाखल केले असता त्यांचा मृत्यू झाला. मारहाणीत वडिलांचा मृत्यू झाल्याचे कोणाला कळू नये म्हणून शुभम याने वडिलांचा अकस्मात मृत्यू झाल्याचे पोलिसांना सांगितल्याने याबाबत शिर्डी पोलिसांनी अकस्मात मृत्यूचा गुन्हा दाखल केला होता. आधी हत्या दडवण्याचा प्रयत्न करत नामानिराळा राहण्याचा प्रयत्न शुभम याने केला. घटनेबाबत पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी लोणी येथील प्रवरा ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आला. शवविच्छेदन अहवालातून आरोपी शुभम गोंदकर याचे पितळ उघडे पडले. आकस्मिक मृत्यूच्या नावाखाली वडिलांच्या हत्येच्या पापापासून पासून सुटू पाहणाऱ्या मुलाविरोधात पोलिस उपनिरीक्षक निवांत जाधव यांनी दिलेल्या फिर्यादीवरून शुभम याच्या विरोधात शिर्डी पोलिस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शिर्डी पोलिस ठाण्याचे निरीक्षक रणजित गलांडे यांच्या मार्गदर्शनाखाली पुढिल तपास सुरू आहे.

# तावशी ग्रामपंचायतीने दारूबंदी ठराव केला एकमताने मंजूर
## राजरोसपणे सुरू असलेल्या दारू विक्रीस पोलिसांचे अभय...

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.११, पंढरपूर :**

पंढरपूर तालुक्यातील मौजे तावशी येथे अवैद्य दारू विक्रेत्यांचा सुळसुळाट मोठ्या प्रमाणावर असून गावात अनेक ठिकाणी अगदी दिवसाढवळ्या अवैद्य दारू विक्री मोठ्या जोमात सुरू होती. त्यामुळे महिला व मुलांना सार्वजनिक ठिकाणी फिरणे सुद्धा मुश्किल झाले होते. गावातील पाणी फिल्टर्स जवळ मोठ्या थाटात दारूचे दुकान चालू होते. त्यामुळे महिलांना पिण्याचे पाणी भरणे सुद्धा मुश्किल झाले होते.



> पोलीस प्रशासनातील काही कर्मचाऱ्यांचे पाठबळावर तावशी गावात अवैध दारू व्यवसाय सुरू असून राज्य उत्पादन शुल्क विभाग ही याकडे जाणूनबुजून दुर्लक्ष करीत आहेत. आम्ही सध्या संपूर्ण गावात दारूबंदीचा निर्णय ठराव करून घेतला. यानंतर ही काही झारीतील शुक्राचार्यांचे सहकार्याने दारू विक्री करण्याचा प्रयत्न झाल्यास तीव्र आंदोलन छेडणार आहोत.
> **- हनुमंत आसबे (सरपंच, ग्रामपंचायत तावशी)**

या दारू विक्रीमुळे अनेक मुले व्यसनाच्या आहारी गेली होती. वरचेवर तळीरामांची संख्या वाढली होती. दारू दुकानाजवळ परवाच्या भाषेचा सर्रास वापर होत होता. अनेक घाणेरड्या शिव्या ऐकावयास मिळत होत्या. कळस म्हणून की काय ज्या शाळेत शिक्षणाची गंगा एकेकाळी वाहत होती, ज्या शाळेत अनेक मुलांचे आयुष्य घडले. त्या पडक्या शाळेतच दारू विक्री कित्येक महिन्यापासून मोठ्या जोमाने होत आहे. हे सर्व अगदी राजरोसपणे घडत असताना पोलीस प्रशासनाकडून कोणतीही कारवाई कधी झाली नाही. हे विशेष गावाचे नुकतेच पदभार स्वीकारलेले नूतन सरपंच हनुमंत आसबे व उपसरपंच अमोल कुंभार यांनी यात पुढाकार घेत ग्रामपंचायतीचा दारूबंदीचा ठराव पोलीस प्रशासनाला पाठवून दिला होता. या अवैध धंद्यावर तरीसुद्धा कोणतीही कारवाई झाली नव्हती. म्हणून आता सरपंच व उपसरपंच यांनी याचे ग्रामपंचायत ठराव मुख्यमंत्री, गृहमंत्री महाराष्ट्र राज्य, खासदार प्रणिती शिंदे, आमदार समाधान अवताडे, जिल्हाधिकारी सोलापूर, पोलीस अधीक्षक सोलापूर, प्रांताधिकारी तसेच तहसीलदार यांना सदर ठरावाची प्रत पाठवून दिलेली आहे.

निदान आता तरी वरील माहिती पाठवलेले यांच्या सन्मानासाठी तरी पोलीस कारवाई करणार का? असा संतप्त सवाल गावातील ग्रामस्थ व महिला विचारत आहेत व म्हणत आहेत. ही सर्वसामान्यांची अर्थ हाक आता तरी तुम्हाला ऐकू येईल का?

# नागपूर मेट्रो सुसाट; अर्थसंकल्पात 'इतक्या' कोटींची तरतूद



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.११, नागपूर :** विधानसभा निवडणुकीनंतर महायुती सरकारच्या पहिल्या अर्थसंकल्पात नागपूर-विदर्भाच्या विकासाला चालना देण्याची ग्वाही अर्थमंत्र्यांनी देत नागपूर मेट्रोच्या दुसऱ्या टप्प्यासाठी १६५ कोटी रुपये दिले. उमरेड रोडवर हातमाग महामंडळाच्या जागेवर 'अर्बन हाट' स्थापन करण्याची घोषणाही त्यांनी केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एक दशकापासून विदर्भावर लक्ष केंद्रित केले आहे. यावेळीही आमगाव ते खामगावपर्यंतच्या विविध प्रकल्पांवर नव्याने भर दिला आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विधानसभेत तर अर्थ राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी विधान परिषदेत अर्थसंकल्प सादर केला. गडचिरोली जिल्ह्याचे फडणवीस पालकमंत्री तर, जयस्वाल सहपालकमंत्री आहेत, हे विशेष. उपराजधानीत मेट्रोचा दुसरा टप्पा ६ हजार ७०८ कोटी रुपयांचा आहे.ऑटोमोटिव्ह ते कन्हान, मिहान ते बुटीबोरी ईएसआर, प्रजापतीनगर ते ट्रान्स्पोर्टनगर, लोकमान्यनगर ते हिंगणा या चार मार्गावर सुमारे बाराशे कर्मचारी काम करत असल्याने ४३ किलोमीटर लांबीच्या कामांना गती आली. या मार्गावर ३२ स्टेशन आहेत. येत्या तीन वर्षात हा टप्पा पूर्ण करण्याचे सरकारचे प्रयत्न आहेत. या मार्गामुळे मेट्रोचे जाळे एकूण ८४ किलोमीटरचे होईल आणि एकूण ७२ स्टेशन राहतील. तीन वर्षात काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे. या कामाला सहा महिन्यांपासून वेग आहे. राज्यातील वस्त्रोद्योगास चालना देण्यासाठी केंद्राच्या राष्ट्रीय हातमाग विकास महामंडळाच्या सहकार्याने उमरेड रोडवरील हातमाग महामंडळाच्या जागेवर 'अर्बन हाट' उभारण्यात येणार आहे. आठ कोटी रुपयांच्या प्रकल्पामुळे ग्राहकांना हातमाग हस्तकलेची अन्य उत्पादने मिळतील. तसेच, शहरात आणखी एक वास्तू तयार होईल. महामंडळाच्या अखत्यारित साडे पाच एकर जागा असून सुमारे दोन एकर जागेवर ८० स्टॉल्स बांधण्यात येतील. यात केंद्राकडून ६ कोटी ४० लाख रुपये व राज्य सरकारकडून १ कोटी ६० लाख रुपये देण्यात येणार आहेत.

## थोडक्यात

### नवी मुंबई विमानतळाचं ८५ टक्के काम पूर्ण...

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.११, नवी मुंबई :** नवी मुंबईतील उलवे येथे १ हजार १६० हेक्टर क्षेत्रामध्ये नव्याने विकसित होत असलेल्या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाची दरवर्षी ९० दशलक्ष प्रवासी आणि २.६ दशलक्ष टन माल वाहतुकीची क्षमता असणार आहे. या प्रकल्पाचे सुमारे ८५ टक्के काम पूर्ण झाले असून चाचणी उड्डाणेही यशस्वीरीत्या पार पडली आहेत. तेथून एप्रिल, २०२५ मध्ये देशांतर्गत विमानसेवा सुरू करण्याचे नियोजन आहे. नागपूर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळाचे खाजगी सहभागातून श्रेणीवर्धन आणि आधुनिकीकरण करण्यात येत आहे. प्रवासी आणि मालवाहतूक क्षमतेत त्यामुळे वृध्दी होईल. विदर्भाच्या सर्वांगीण आर्थिक विकासाला यामुळे चालना मिळेल. शिर्डी विमानतळाच्या १ हजार ३६७ कोटी रुपये किंमतीच्या विकासकामांना मान्यता देण्यात आली असून ती कामे सुरू आहेत. २०२१ मध्ये शिर्डी विमानतळाला प्रमुख विमानतळाचा दर्जा प्राप्त झाला आहे. नाइट लँडिंगची सुविधाही लवकरच सुरू करण्यात येणार आहे. अमरावतीतील बेलोरा विमानतळाचे काम पूर्ण झाले असून तेथून ३१ मार्च,२०२५ पासून प्रवासी सेवा सुरू करण्याचे नियोजन आहे. रत्नागिरी विमानतळाची १४७ कोटी रुपये रकमेची कामे प्रगतिपथावर आहेत. गडचिरोली येथील नवीन विमानतळाच्या सर्वेक्षण व अन्वेषणाची कामे सुरू आहेत. अकोला विमानतळाच्या विस्तारासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

### पुणे शहरात वेगवेगळ्या अपघातात दोघांचा मृत्यू...

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.११, पुणे :** शहरात वेगवेगळ्या अपघातात दोघांचा मृत्यू झाल्याची घटना घडली. हडपसर, तसेच पुणे-सोलापूर रस्त्यावरील लोणी काळभोर परिसरात अपघाताच्या घटना घडल्या.

हडपसर भागात दुचाकीच्या धडकेत गंभीर जखमी झालेल्या पादचाऱ्याचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची घटना घडली. अपघातानंतर पसार झालेल्या दुचाकीस्वाराविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, त्याचा शोध घेण्यात येत आहे. विठ्ठल दत्तू मर्ढेकर (वय ४९, रा. पॉवर हाऊस, फुरसुंगी, हडपसर-सासवड रस्ता) असे मृत्युमुखी पडलेल्या पादचाऱ्याचे नाव आहे. याबाबत मर्ढेकर यांची पत्नी चंदा (वय ४०) यांनी हडपसर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, दुचाकीस्वाराविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, विठ्ठल मर्ढेकर हे ६ फेब्रुवारी रोजी हडपसर भागातील संजीवनी हॉस्पिटललसमोरुन सायंकाळी सहाच्या सुमारास निघाले होते. त्या वेळी पाठीमागून आलेल्या भरधाव दुचाकीस्वाराने मर्ढेकर यांना धडक दिली.

अपघातात त्यांच्या पायाला मोठी जखम झाली. त्यांना खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. सहायक पोलीस निरीक्षक परवेज शिकलगार तपास करत आहेत.

# संपादकीय



## बाळा, येऊन एकदा भेट रे!

सोशल मीडियावर एक अतिशय भावनिक व वेदनादायी व्हिडिओ पाहिला.वृध्दाश्रमात कुंठित जीवन जगणारा एक बाप वृध्दाश्रमातील एका कार्यक्रमात बोलताना आपल्या मुलाला हाक मारत आहे आणि अंतरीच्या वेदना जग जाहीर करत आहे.तो बाप आपल्या मुलाला कवितेच्या माध्यमातून अतिशय भावनिक साद घालताना म्हणतो,'बाळा वृध्दाश्रमात येऊन मला एकदा भेट रे,येथे जीव गुदमरतो मला घरी घेऊन जा रे!'

हा व्हिडिओ पाहताना अंगावर शहारे येतात आणि मनाला अतिव वेदना देऊन जातात.वृध्दाश्रमातील एका वडिलांची ही आर्त हाक मन बधीर करते,रक्त गोठवते,हृदयाला भेगा पाडते आणि माणसा तू माणूसच आहेस ना?असा प्रश्न विचारते!

मागचा पुढचा विचार न करता आणि पत्नीच्या आहारी जाऊन आपल्या आईवडिलांना वृद्धाश्रमात ठेवणाऱ्या मुलांनी एवढे निर्दयी का बनावे?आपल्या आईवडिलांना वृध्दाश्रमात ठेवून आपण आनंदाने जीवन जगूच शकत नाही.म्हणून तुम्ही तुमच्या पत्नीला समजावून सांगा की,हे बघ बाई मी काही आकाशातून अलगद पडलेला प्राणी नाही.माझ्या आईवडिलांनी मला लाडाकोडात वाढवले आहे, मोठ्या कष्टाने मला माझ्या पायावर उभे केले आहे.आपले हे सगळे वैभव केवळ त्यांच्यामुळे निर्माण झाले आहे.मी त्यांना वृध्दाश्रमात पाठवू शकत नाही.पत्नीला असे ठणकावून सांगा.हे ऐकून सुध्दा ती हट्ट करत असेल आणि स्वतःच्या विचारांवर ठाम असेल तर मग तुम्ही तुमच्या पत्नीला समजावून सांगा की,मॅडम तुम्हाला तुमचे आईवडील जेवढे प्यारे आहेत तसेच माझे आईवडील

सुध्दा मला प्रिय आहेत.काहीही झाले तरी मी माझ्या आईवडिलांना वृद्धाश्रमात पाठवणार नाही.जर तुम्ही तुमच्या पत्नीला एवढे ठणकावून सांगू शकत नसाल तर मग तुम्ही भेदरट आहात,तुमच्या जीवनाला काही अर्थ नाही!वृध्द आईवडिलांना तुम्ही सांभाळू शकत नसाल तर मग भविष्यात तुमच्यावर सुध्दा तीच वेळ येणार आहे हे लक्षात घ्या.जैसी करणी वैसी भरणी हे उगाच म्हटले जात नाही हे लक्षात ठेवा.

स्वतःला उच्चभ्रू,उच्चशिक्षित आणि हायफाय समजणाऱ्या लोकांच्या आदर्श सोसायटीच्या गार्डनमध्ये एकेदिवशी मी मॉर्निंग वॉकला गेलो होतो.तेथे आलेल्या व्यक्तींपैकी काही गार्डनमध्ये फिरत होते,काही लोक ओपन जीममध्ये घाम गाळत होते आणि वृद्ध स्त्रिया व वृद्ध पुरुष एका बाजूला बसले होते.त्यातील दोन स्त्रिया चर्चा करत होत्या.त्यातील एक स्त्री आवाज वाढवून म्हणाली,'आमचं नशीबच फुटके आहे.चार चार मुले असूनही आम्हाला म्हातारपणात सुख नाही.सुनांना आम्ही सासू सासरे सहन होत नाही आणि आमची बाईलवेडे मुले आमच्याशी मनमोकळे बोलत नाहीत.आमच्या वाटण्या करून टाकल्या त्यांनी. सुनांच्या धाकात राहावे लागते आम्हाला.इथे बसू नका तेथे बसा हे नेहमी ऐकून घ्यावे लागते.'

हे ऐकून आजकालच्या लोकांच्या विचित्र मानसिकतेची जाणीव झाली.धकाधकीच्या जीवनात माणूस किती स्वार्थी आणि अहंकारी झाला आहे याची प्रचीती आली.आजच्या काही सुनांना सासू सासऱ्याचा सांभाळ का करू वाटत नसेल?हे न उलगडणारे कोडे आहे.गंमत अशी की या सुनांना त्यांच्या भावांनी मात्र आईवडिलांना जीवापाड सांभाळलेच पाहिजे अशी मानसिकता असते! म्हणजे आपण कसेही वागले तरीही चालते पण दुसऱ्यांनी मात्र नेक व चांगले वागलेच पाहिजे.वाह रे विकृत मानसिकता!शहरात व महानगरात कुटुंबासह राहणाऱ्या मुलांकडे गावाकडे राहणारे आईवडील आले की सुनांवर आभाळ कोसळते. हिरवेगार तोंड करून त्या भांड्यांची आदळ आपटे करतात. याच सुना मात्र स्वतःचे आईवडील आल्यावर आनंदी चेहऱ्याने घरात वावरतात.सण उत्सव असल्यासारखे जेवायला गोडधोड पदार्थ बनवतात.सुनांची ही विचित्र मानसिकता कधी कायमचे संपणार आहे की नाही?खरेतर सासू सासऱ्यांचा सांभाळ न करणाऱ्या सुना हा मानवजातीला लागलेला कलंक आहे.हा कलंक धुवून पुसून टाकायचा असेल तर वृध्द आईवडिलांच्या मुलांनी खंबीरपणे आपल्या आईवडिलांना जीवापाड सांभाळलेच पाहिजे.वृध्दाश्रमात ठेवलेल्या आईवडिलांना तात्काळ घरी आणले पाहिजे.जर पत्नी आईवडिलांसोबत माणुसकीने वागत नसेल तर तुम्ही तिला सन्मानाने तिच्या माहेरी पाठवा. तुमच्या आईवडिलांसोबत नीट माणुसकीने न वागणारी पत्नी भविष्यात तुमच्यासोबत नीट राहील याची शाश्वती देता येत नाही.आईवडील आपले दैवत असतात,हे सुंदर जग आपण त्यांच्यामुळेच पाहत असतो हे नेहमी लक्षात ठेवा पोरांनो! आईवडिलांचा सांभाळ करणे आपल्या सर्वांचे ते कर्तव्यच आहे.

# सत्यमेव जयते!

खऱ्याची दुनिया राहिली नाही...! असं दोन सदगृहस्थ एकमेकांशी बोलत होते. त्यांच्या बोलण्याकडे लक्ष दिलं. त्यांच्या बोलण्यातील संदर्भ शोधण्याचा ; आणि त्यांची ही समज कशी दृढ झाली असावी याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला... सत्यमेव जयते! हे आपल्या भारतीय शासकीय कारभाराचे सूत्र आहे.' सत्याचा नेहमी विजय होतो' , हे सर्व धर्मांनी देखील अग्रहाणे सांगितले आहे.

शाळेमध्ये सगळ्यात सोपा सुविचार असतो तो म्हणजे...' नेहमी खरे बोलावे.' प्रत्येक काळात खऱ्याची आणि खोट्याची लढाई झालेली आपण ऐकतो. आणि त्यात खऱ्याचाच विजय झाल्याचे नेहमी सांगितले जाते. महात्मा गांधीजी यांनी देखील सत्य आणि अहिंसा या दोन गोष्टींचा अवलंब करत भारतीय स्वातंत्र्य लढ्याचे नेतृत्व केले होते. सत्याचा आग्रह करण्याच्या त्यांच्या आंदोलनामुळे इंग्रजांवर त्यांची वचक होती.महात्मा ज्योतिबा फुले यांनी सत्याला आपला देव मानले. विषमतेचा आणि अन्यायाचा नाश करण्यासाठी त्यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. एवढं सारं खऱ्या गोष्टीच्या समर्थनार्थ आपल्याला माहित असतानाही आपण सत्याचा मार्ग का धरत नाही? कारण सत्य हे नेहमी कडवं असतं ; आणि माणसाला कडवटपणा आवडत नसतो. सत्य हे पचायला अवघड असतं. सत्य हे पारदर्शक आणि निर्मळ असतं. सत्याचा मार्ग खडतर असला तरी तो एकमेव नीतिमान जीवनाचा पाया असतो.

**सत्य परेशान हो सकता है,**
**लेकिन हार नही सकता!**

हे सिनेमातील वाक्य खूप प्रसिद्ध आहे. अनेक माध्यमातून आपल्याला सत्याचं महत्त्व सांगितलं जातं.असत्याचा बोलबाला असलेल्या आजच्या काळात ' सत्यमेव जयते!' म्हणणे ही फॅशन बनली आहे. ज्याला जेवढं शक्य होईल तेवढं तो खोटं- नाटं करून आपला स्वार्थ साधत आहे. बनवाबनवी, लपवालपवी, दिखावा हे सर्व व्यवस्थामध्ये प्रकर्षानं दिसून येत आहे.१०० टक्के खरं काम काही वेळा शक्य नसलं, तरी पूर्णत्वास जाण्याचा देखील प्रयत्न होताना दिसत नाही. सोशल मीडिया वरून ' फेक नरेटिव्ह ' पसरवलं जात आहे. लोकांची समज बदलण्याचा आणि त्यांचा दृष्टिकोन चुकीचा बनवण्याचा प्रयत्न केला जात आहे. खरं तर हे असं खोटं विष समाजात कालवण खूपच धोकादायक आहे. डावे लोक अति डावे झाले आहेत, तर उजवे लोक अतिउजवे झाले आहेत. यातून कट्टरवाद वाढत आहे. आपल्या विचारांचा प्रसार करण्यासाठी खोट्या गोष्टीचा आधार मोठ्या प्रमाणात घेतला जात आहे. सन्मार्गाने पैसा कमवून शांततामय सहजीवन जगणे अशक्य झाल्यामुळे अनेकांच्या तोंडून ' खऱ्याची दुनिया राहिली नाही!' असे वाक्य खूप वेळा ऐकायला मिळत आहे. प्रसार माध्यमावरून खोट्या जाहिरातींचा भडिमार सुरू आहे. त्वचेचा रंग बदलण्याची ताकद कोणत्याच गोष्टीत नसतानाही गोरी बनवणारी क्रीम आहे... असं उघड उघड सांगणारी जाहिरात दाखवली जात आहे. चहाचे दुष्परिणाम सर्वांना समजले असतानाही अमुक अमुक चहा पिल्यानंतर वाघासारखी ताकद अंगात येते... असं दाखवणारी जाहिरात साऱ्यांचे लक्ष वेधून घेत आहे. मालिका, वेब सिरीज आणि सिनेमातून लैंगिकता, हिंसाचार आणि चंगळवाद याचे उदात्तीकरण मोठ्या प्रमाणात होत आहे. यातून खोट्या गोष्टींना बळ मिळत आहे. हिटलरच्या काळातील नाझी जर्मनीचा मंत्री जोसेफ गोएबल्स म्हणायचा, ' एखादी खोटी गोष्ट सतत सांगत राहिलो, तर ती गोष्ट लोकांना खरी वाटू लागते.' लोकांचे विचार आणि मत परिवर्तन करण्याच्या या तंत्राला पुढे 'गोएबल्स तंत्र' म्हणून ओळखलं जाऊ लागलं. ज्याचा वापर राजकीय परिवर्तनासाठी मोठ्या प्रमाणात केला गेला. इमानदारीने जगणारा माणूस बिचारा ठरत आहे. त्याला कोणी रक्षणकर्ता नाही.याउलट खोटं-नाट करणाऱ्याला समाजात प्रतिष्ठा, मान-सन्मान आणि मोठ्या प्रमाणात पाठिंबा मिळत आहे. खोटं सफाईदारपणे बोलू शकणारा, मांडू शकणारा आणि भासवू शकणारा आजच्या काळातील 'नायक' ठरत आहे. ज्याला असत्याशी लढता येत नाही ते पांडवातील युधिष्ठराच्या भूमिकेत आले आहेत.'नरो वा कुंजरो वा ' म्हणत अर्थसत्य बोलत खोट्यांची पाठराखण करत आहेत. अशा काळात ' सत्यमेव जयते!' हा आपला नारा बुलंद करण्यासाठी आता 'खऱ्याची दुनिया नाही...! ' असं हताशपणे न म्हणता पुढं आलं पाहिजे.

**- किशोर जाधव सोलापूर**
**मो. नं. ९९२२८८२५४१**

# 'होळी' सणाचे पावित्र्य राखा !

दुष्प्रवृत्ती आणि अयोग्य विचार यांची होळी करून सत्प्रवृत्ती जोपासण्याचा संकल्प करण्याचा सण म्हणजे होळी. भारतात स्थानपरत्वे हा सण साजरा करण्याच्या पद्धतीही भिन्न भिन्न असल्याच्या पाहायला मिळतात. होळी साजरी करण्यामागील कथाही राज्यानुसार आणि चालीरीतीनुसार वेगवेगळ्या सांगितल्या जातात. काही प्रदेशात होळीला अधिक महत्व दिले जाते, तर काही ठिकाणी होळीनंतर येणाऱ्या रंगपंचमीला.

गेल्या काही वर्षांत शहरासारख्या ठिकाणी होळी सणामध्ये गैरप्रकारांचा मोठ्या प्रमाणात शिरकाव झालेला पाहायला मिळतो ज्यामुळे या सणाचे पावित्र्य कुठेतरी कमी होऊ लागले आहे. होळीचे निमित्त करून आठवडाभर आधीपासूनच इमारतींच्या गच्चीवरुन, रेल्वे गाड्या, बसेसवर पाण्याने भरलेले फुगे, प्लास्टिक पिशव्या फेकून मारल्या जातात. यांमध्ये शालेय आणि महाविद्यालयीन मुलींसह नोकरी व्यवसायानिमित्त घराबाहेर पडणाऱ्या तरुणींना खासकरून लक्ष्य केले जाते. नुकत्याच पार पडलेल्या जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने समस्त युवावर्गाने आपल्या सोशल मीडिया अकाउंटवर



महिलांच्या सन्मानार्थ स्टेटस आणि पोस्ट लावल्या होत्या तोच युवावर्ग आज होळीचे निमित्त साधून महिलांवर पाण्याने भरलेल्या प्लॅस्टिकच्या पिशव्या फेकताना दिसत आहे. आज आपण येणा-जाणाऱ्या महिलांवर ज्याप्रमाणे पाण्याच्या पिशव्या फेकून मारत आहोत, कुठेतरी आपल्या आईला, बहिणीला आणि प्रियजनांनाही अशा प्रकारच्या त्रासाचा सामना करावा लागत असेल याचा विचार ही मंडळी केव्हा करणार ? दरवर्षी केवळ पाण्याने भरलेले फुगे आणि पिशव्या मारण्यामुळे कितीतरी अपघात घडतात, कितीतरी जणांना आपले डोळे गमवावे लागतात, तर कित्येकांना कायमस्वरूपी अपंगत्व येते. मागील ५-६ वर्षांपासून होळीच्या निमित्ताने फुग्यांना पर्याय म्हणून पातळ प्लास्टिक पिशव्या विक्रीसाठी बाजारात येऊ लागल्या आहेत. धूलिवंदनाच्या दिवशी दुपारीच या प्लास्टिक पिशव्यांचा खच रस्त्यावर साचलेला पाहायला मिळतो. हवेसोबत उडत जाऊन या पिशव्या नाल्यांत आणि गटारांत साचतात. २६ जुलै २००५ या दिवशी मुंबईत महाप्रलय आला होता ज्याला मुख्यत्वे कारणीभूत प्लास्टिक पिशव्याच होत्या. वर्षभर प्लास्टिक निर्मूलनासाठी प्रयत्न करणारे पालिका प्रशासन होळीच्या दिवसांत मोठ्या प्रमाणात वितरित होणाऱ्या प्लास्टिक पिशव्यांवर कायदेशीर कारवाई करताना कुठे दिसत नाही.

काही ठिकाणी परस्परांतील वैमनस्य काढण्यासाठी इतरांच्या वस्तू चोरून त्या होळीत जाळल्या जातात. होळीच्या ठिकाणी बोंब मारण्याची प्रथा पूर्वापार चालत आली आहे; मात्र हल्ली या प्रथेच्या आड कुणाचे तरी नाव घेऊन घाणेरड्या शिव्या घातल्या जातात. धुलीवंदनाच्या दिवशी एकमेकांना रासायनिक रंग फासले जातात ज्यामुळे बऱ्याचदा गंभीर स्वरूपाचे त्वचाविकार होतात. नासकी अंडी फेकून मारली जातात, मद्यपान करून रस्त्यांवर धिंगाणा घातला जातो, महिलांना पाहून अश्लील शेरेबाजी केली जाती. लोकांना आणि गाड्या अडवून जबरदस्तीने पैसे उकळले जातात. या अपप्रकारांना रोखण्यासाठी दरवर्षी पोलिसांना शासनाकडून आदेश द्यावे लागतात, याची खरे तर आपल्याला लाज वाटायला हवी. हिंदू धर्मातील प्रत्येक सण आणि उत्सव यामागे लोककल्याणाचा आणि सामाजिक एकोप्याचा उदात्त हेतू दडलेला आहे. होळीसारख्या पवित्र सणामध्ये शिरलेल्या गैरप्रकारामुळे या दिवसांत अनेक जण घराबाहेर पडणे टाळू लागले आहेत. सणांमागील शास्त्र लक्षात घेऊन ते साजरे केल्यास मनुष्याला त्यातून आनंद मिळतो: मात्र होळीसारख्या पवित्र सणाला आलेले ओंगळवाणे स्वरूप पाहता आपणच आपल्या धर्माची अवहेलना करत आहोत हे हिंदू केव्हा जाणणार आहेत ?

**- जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क : ९६६४५५९७८०**

## चषक आपला..




स्वप्नांची स्वयंपूर्णता
विश्व चषक आपला
चक दे इंडिया नारा
क्रिडाजगते व्यापला

अप्रतिम खेळ करी
गाजवी खेळशृंखला
स्मरणातअटीतटीचा
अंतीसामनाजिंकला

अशी द्यायची झुंज रे
रसिका देती दाखला
चक्रव्यूह डावपेच ते
दूरदर्शी पथ आखला

भल्यादिग्गजसंघाचा
प्रयासे वारु रोखला
हम किसेसे कम नहीं
तिरंगासन्मानराखला

दीडदशक प्रतिक्षेतले
सूर्य अंमळ झाकला
ढगांचे आवरण नश्वर
प्रकाश जगी फाकला

कसेकरावे अभिनंदन
शब्दकोषही थबकला
ज्ञात अज्ञात कैकजण
धन्यवाद द्यावे सकला


**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

# महाराष्ट्राचे भाग्यविधाते यशवंतराव चव्हाण...

महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री, राष्ट्रीय राजकारणातील द्रष्टे नेते स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांची आज जयंती. आजच्याच दिवशी म्हणजे १२ मार्च १९१३ रोजी सातारा जिल्ह्यातील देवराष्ट्रे या छोट्याशा गावातील एका सामान्य शेतकरी कुटुंबात त्यांचा झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण कराड येथे झाले, तर उच्चशिक्षण कोल्हापूर व पुणे येथे झाले.

पुण्यात त्यांनी बीए - एलएलबी चे शिक्षण पूर्ण केले. महात्मा गांधीजींच्या स्वातंत्र्य आंदोलनाने प्रेरित होऊन त्यांनी स्वातंत्र्य संग्रामात भाग घेतला. १९३० साली त्यांनी महात्मा गांधीजींच्या सविनय आंदोलनात भाग घेतला. १९३२ साली त्यांना तुरुंगवास भोगावा लागला. १९४२ च्या चले जाव आंदोलनातही त्यांनी भाग घेतला. सातारा जिल्ह्यातील भूमिगत चळवळीत त्यांनी महत्वाची भूमिका बजावली. १९४६ साली मुंबई प्रांताच्या विधिमंडळ निवडणुकीत दक्षिण सातारा मतदारसंघातून ते निवडले गेले आणि संसदीय मंडळाचे चिटणीस बनले. १९४८ साली त्यांची काँग्रेसच्या चिटणीस पदावर निवड झाली. १९५२ च्या निवडणुकीनंतर ते स्थानिक स्वराज्य संस्था व पुरवठा खात्याचे मंत्री बनले. द्विभाषिक राज्याचे मुख्यमंत्री म्हणून त्यांनी १ नोव्हेंबर १९५६ रोजी सूत्र हाती घेतले.

संयुक्त महाराष्ट्राची स्थापना झाल्यावर ते महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री बनले. १ मे १९६० रोजी त्यांनी महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. मुख्यमंत्री असताना त्यांनी राज्यातील अनेक उपक्रमांना चालना दिली. महाराष्ट्राच्या विकासाची मुहूर्तमेढ त्यांनी रोवली म्हणूनच त्यांना महाराष्ट्राचे भाग्यविधाते म्हणतात. १९६२ मध्ये चीन युद्धाच्या वेळी तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरूंनी यशवंतराव चव्हाणांची नेमणूक देशाच्या संरक्षणमंत्रीपदावर केली. परकीय अक्रमणाच्यावेळी देश संकटात असताना हा सह्याद्री हिमालयाच्या मदतीला धावून गेला. चिनी आक्रमणानंतर संरक्षण दलात चैतन्य



आणण्याची जबाबदारी त्यांनी यशस्वीरीत्या पेलली. १९६७ सालच्या निवडणुकीत अनेक राज्यात काँग्रेसचा पराभव झाला. त्याकाळात देशात अस्थिर परिस्थिती निर्माण झाली होती त्या परिस्थितीत त्यांनी गृहखाते यशस्वीरीत्या सांभाळले. अर्थमंत्री म्हणूनही त्यांची कारकीर्द गाजली. बांगलादेशचे युद्ध, दुष्काळ यामुळे खालावलेल्या देशाच्या अर्थव्यवस्थेला त्यांनी चालना दिली. संस्थानिकांचे तनखे रद्द करणे, बँकांचे राष्ट्रीयीकरण करणे यासारखे महत्वाचे निर्णय ते अर्थमंत्री असतानाच घेतले गेले. चलनवाढिला आळा घालण्यासाठी कडक उपाययोजना करण्याचे धोरण देखील त्यांच्याच काळात आखण्यात आले. देशाचे परराष्ट्र मंत्री म्हणूनही त्यांनी काही काळ काम केले. पुढील काळात देशाचे उपपंतप्रधानपदाची जबाबदारीही त्यांनी यशस्वीरीत्या सांभाळली. देशात जनता पक्षाचे सरकार असताना ते विरोधी पक्षनेते होते. आठव्या वित्त आयोगाचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम केले. महाराष्ट्राचे भाग्यविधाते, कार्यक्षम मंत्री, उत्तम संसदपटू, उदारमतवादी नेते अशी जनमानसात त्यांची प्रतिमा निर्माण झाली. महाराष्ट्राच्या गौरवशाली इतिहासात त्यांनी मानाचा तुरा रोवला. महाराष्ट्राच्या या सुपुत्राने देशातच नव्हे तर जगात महाराष्ट्राचे नाव उज्ज्वल केले.

यशवंतराव जितके महान नेते होते तितकेच ते अभिजात साहित्यिकही होते. ललित, आत्मचरित्र, चरित्रात्मक लेखन, व्यक्तिचित्रणपर आठवणी, प्रवासवर्णन, स्फुटलेखन, वैचारिक लेख, समीक्षणात्मक लेख, पत्रलेखन, भाषणे इत्यादी स्वरूपात त्यांनी लेखन केले आहे. त्यांच्या कृष्णाकाठ, ऋणानुबंध, युगांतर, भूमिका, शिवनेरीच्या नौबती, विदेश दर्शन, सह्याद्रीचे वारे या ग्रंथातून त्यांच्या लेखन प्रतिभेचा परिचय होतो. ते जरी राजकारणी असले तरी त्यांच्यामधील चिंतनशील रसिक, सामाजिक विचारवंत ह मात्र साहित्याबरोबरच राहिला होता. त्यांच्या सर्व कलाकृती लक्षवेधक आहेत. यशवंतराव चव्हाण हे खऱ्या अर्थाने लोकनेते होते. भारतीय राजकारणातील त्यांचे योगदान अद्वितीय असेच आहे. महाराष्ट्रासाठी तर त्यांचे योगदान अनमोल असेच आहे. महाराष्ट्र त्यांचे योगदान कधीही विसरू शकत नाही. २५ नोव्हेंबर १९८४ रोजी त्यांचे निधन झाले. आज त्यांच्या जयंतीदिनी त्यांचे स्मरण करणे हे आपले कर्तव्यच आहे. यशवंतराव चव्हाण यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन !

**- श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात

### खा.लंके यांचा गड किल्ले संवर्धनाचा संकल्प;
#### राज्यभरातील हजारो स्वयंसेवकांचा सहभाग



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.११, पारनेर (अहिल्यानगर) :** छत्रपती शिवाजी महाराजांचे सह्याद्रीच्या कुशीतील गड, किल्ले तसेच दुर्ग यांच्या संवर्धनाची मोहीम महिन्यातून एका रविवारी करण्याचा संकल्प खासदार निलेश लंके यांनी अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त त्यांच्या हंगा या गावी काल सोमवारी पत्रकार परिषदेत सांगितले. रविवार, दिनांक १६ मार्च २०२५ रोजी या मोहिमेला शिवजन्मभूमी किल्ले शिवनेरी येथून सुरुवात होणार असल्याचे खासदार लंके यांनी जाहीर केले. खासदार निलेश लंके यांच्या वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी त्यांना शुभेच्छा देण्यासाठी जिल्ह्याच्या विविध भागांतून अनेक मान्यवरांनी हजेरी लावली होती. नगर दक्षिण म तदारसंघातील पुरुषांबरोबर महिलांची गर्दी ही यावेळी लक्षणीय होती. आपल्या संकल्प विषयी बोलताना खा. लंके यांनी सांगितले की, महाराष्ट्रातील ऐतिहासिक किल्ल्यांचे, दुर्गांचे जतन, संवर्धन, पुनर्जीवन आणि संरक्षण करण्याची चळवळ हाती घेण्यात येत आहे. सह्याद्रीच्या कुशीतील गड किल्ले टिकविणे, ऐतिहासिक संस्कृती आणि पर्यावरणाची जपणूक करणे ही काळाची गरज आहे. किल्ले हे छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी राजे यांच्या पराक्रमाचे प्रतिक असल्याचे खासदार लंके यांनी सांगितले.

## शोले स्टाईल आंदोलन करत कांद्याचे लिलाव पाडले बंद

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१०, विंचूर (नाशिक) :** केंद्र सरकारने कांद्यावर लागू केलेले २० टक्के निर्यात शुल्क तत्काळ पूर्णत: रद्द करावे. तसेच कांद्याला हमी भाव जाहीर करावा आदी मागण्यासाठी सोमवार, दिनांक १० मार्च २०२५ रोजी सकाळी लासलगाव बाजार समितीच्या आवारात संतप्त झालेल्या कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी सरकारचे लक्ष वेधण्यासाठी पाण्याच्या टाकीवर चढून शोले स्टाईल आंदोलन करून कांद्याचे लिलाव बंद पाडले.



आज राज्याच्या अर्थसंकल्पाला सुरुवात होत असून त्यापूर्वीच सरकारचे लक्ष वेधण्यासाठी शिवसेना ऊबाठा गटाचे केशव जाधव, जिल्हाध्यक्ष कांदा उत्पादक शेतकरी संघटना केदारनाथ नवले, छावा क्रांतीवीर सेना, शेतकरी आघाडी जिल्हा प्रमुख गोरख संत, प्रहार जिल्हाध्यक्ष गणेश निंबाळकर, छावा क्रांतिवीर सेना तालुकाध्यक्ष प्रफ ुल गायकवाड, निवृत्ती न्याहारकर यांच्या नेतृत्वाखाली संतप्त शेतकऱ्यांनी अचानक आंदोलनाचा पवित्रा घेतल्याने बाजार समितीसह पोलीस प्रशासनाची धावपळ उडाली आहे.

लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कांदा लिलाव आवारात सोमवार, दिनांक १० मार्च २०२५ रोजी सकाळी ९ वाजता कांद्याचे लिलाव सुरू झाले. यावेळी कांदा दरात घसरण झाल्याचे दिसून आल्याने संतप्त झालेल्या शेतकरी प्रतिनिधींनी व कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी पाण्याच्या टाकीवर चढून शोले स्टाईल आंदोलन केले. केंद्र व राज्य सरकारच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी केली.

केंद्र सरकारने कांद्यावर लागू केलेले २० टक्के निर्यात शुल्क तत्काळ रद्द करून शून्य टक्के करावे. कांद्याला २५ रुपये प्रति किलो हमीभाव देण्यात यावा. नाफेड आणि एनसीसीएफ यांनी प्रत्यक्ष बाजार समितीत कांदा लिलावात सहभाग घेऊन प्रत्यक्ष शेतकऱ्यांमधून कांदा खरेदी करावा. व कांदा उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा द्यावा. अशी मागणी गोरख संत यांनी उपस्थित आंदोलकांसमोर केली. दरम्यान संतप्त झालेल्या शेतकरी प्रतिनिधी सोबत राज्याचे माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ व राज्याचे कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांनी संवाद साधला. कांद्यावरील निर्यात शुल्क रद्द व्हावे म्हणून केंद्रीय वाणिज्य मंत्रालयात पाठपुरावा करणार असून विधानसभेत कांद्याचा प्रश्न तातडीने मांडणार असल्याचं आश्वासन या दोन्ही नेत्यांनी यावेळी दिले. बाजार समिती व पोलीस प्रशासनाच्या मध्यस्थीनंतर साधारण एक तासानंतर कांद्याचे लिलाव पूर्ववत सुरु करण्यात आले.

दिनांक १० मार्च २०२५ रोजी सकाळच्या सत्रात लासलगाव बाजार समितीत ५०० वाहनातून उन्हाळ कांद्याची अंदाजे ८७०० क्विंटल आवक होऊन त्यास कमीत कमी ७००/- रुपये, जास्तीत जास्त १९१०/- रुपये तर सरासरी १६५०/- रुपये प्रति क्विंटल असे बाजार भाव मिळाले.

### नदीजोड प्रकल्पाला अर्थसंकल्पात पाठबळ; राधाकृष्ण विखे



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.११, राहाता (अहिल्यानगर) :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा महत्त्वाकांक्षी, राज्यातील नदीजोड प्रकल्पाला निर्धारीत वेळेत पूर्ण करण्याच्या दृष्टीने अर्थसंकल्पातील तरतुदीने मोठे पाठबळ मिळेल. गोदावरी पुनर्भरण आणि मराठवाडा ग्रीडसाठी केलेल्या आर्थिक तरतुदी मुळे महाराष्ट्र दुष्काळमुक्त करण्याचे महायुती सरकारचे स्वप्न पूर्ण होईल, असा विश्वास व्यक्त करत जलसंपदा तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी अर्थसंकल्पाचे स्वागत केले. अर्थसंकल्प शहरी आणि ग्रामीण महाराष्ट्राच्या पायाभूत सुविधांना पाठबळ देणारा असल्याचे सांगत मंत्री विखे म्हणाले, राज्यातील सिंचन सुधारणा कार्यक्रमासाठी नाबार्डच्या सहकार्याने ५०० कोटींची केलेली तरतूद महत्त्वपूर्ण आहे. गाळमुक्त धरण आणि गाळयुक्त शिवारचाही मोठा लाभ शेतकऱ्यांना होईल. कोकणवाहिनी नद्यांचे पाणी गोदावरी खोऱ्यात वळविण्यासाठी अर्थसंकल्पात प्राधान्य देण्यात आले. मराठवाड्यातील २ लाख ४० हजार हेक्टर क्षेत्राला पाणी उपलब्ध करण्याचे महायुतीचे प्राधान्य असल्याने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दुष्काळमुक्त महाराष्ट्र करण्याचा संकल्प पूर्ण होण्यास मोठी मदत होणार असल्याचे विखे यांनी सांगितले. कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून कृषी क्षेत्रातील सुधारणेचे मार्गदर्शन ५० हजार शेतकऱ्यांना देण्याचा निर्णयही महत्त्वाचा ठरेल. शेतकऱ्यांसाठी स्मार्ट कार्यक्रम, आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष आणि हरित ऊर्जेतून सौर पंप योजनेला गती मिळेल. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सर्वासाठी घरेही योजनेला महायुती सरकारने मिशन मोडवर राबविण्याचा निर्णय घेतानाच घरासाठी सौरऊर्जा संच उपलब्ध करून देण्यासाठी ५० हजार रुपयांचे अनुदान निर्णय लाभार्थींना दिलासा ठरेल.

## महाराष्ट्र कुणबी मराठा संघटनेचे पालकमंत्री सरनाईक यांना निवेदन
### ढोकी येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पूर्णाकृती पुतळा उभारणीसाठी प्रशासकीय मान्यता द्या

**अक्षराज : संगीता वनकळस**

**दि.११, धाराशिव :** धाराशिव तालुक्यातील ढोकी येथे छत्रपती शिवाजी महाराज यांचा पूर्णाकृती अश्वारुढ पुतळा उभारणीसाठी प्रशासकीय मान्यता देण्याकरिता सहकार्य करावे, अशी मागणी महाराष्ट्र कुणबी मराठा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष अँड.तुकाराम शिंदे यांनी राज्याचे परिवहन मंत्री तथा धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री प्रतापराव सरनाईक यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.



निवेदनात म्हटले की, छत्रपती शिवाजी महाराज चौक ढोकी येथे छत्रपती शिवाजी महाराज यांचा पूर्णाकृती अश्वारुढ पुतळा उभारण्याच्या मागणीसाठी ढोकी व परिसरातील शिवप्रेमींकडून प्रशासकीय पातळीवर वेळोवेळी निवेदन देण्यात आलेले आहेत. लातूर-बार्शी-पुणे महामार्गावर असलेल्या ढोकी गावाची लोकसंख्या २५ ते ३० हजाराच्या जवळपास आहे. त्यामुळे येथील शिवप्रेमींची पुतळा उभारावा अशी मागणी आहे. याकरिता विविध पातळीवर म न्यता मिळण्याकरिता पालकमंत्री या नात्याने आपले सहकार्य मिळणे गरजेचे आहे. तरी ढोकी येथे छत्रपती शिवाजी महाराज यांचा पूर्णाकृती अश्वारुढ पुतळा उभारण्यास प्रशासकीय मान्यता मिळण्यासाठी आपल्या पातळीवरून प्रयत्न करावेत असे अँड.तुकाराम शिंदे यांनी निवेदनात नमूद केले आहे.

### थकीत ऊस बिलासाठी स्वाभिमानी संघटना आंदोलनाच्या पवित्र्यात



**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.११, पंढरपूर :** थकीत ऊस बिले १५ तारखेपर्यंत जमा न झाल्यास स्वाभिमानी शेतकरी संघटना प्रादेशिक साखर सह संचालक सोलापूर कार्यालयासमोर आंदोलन करणार असल्याचे निवेदन युवा जिल्हा अध्यक्ष विजय रणदिवे यांनी दिले. सोलापूर जिल्ह्यातील २०२४-२५ चा ऊस गाळप हंगाम संपून महिना झाला बहुतांश साखर कारखान्यांनी डिसेंबर पासून ची एफ.आर.पी (उसबिले) जमा केलेली नाहीत. ऊस कायदा १९६६ नुसार ऊस गाळप झाल्यापासून १४ दिवसाच्या आत ऊस बिले जमा करणे बंधन कारक असताना जिल्ह्यातील साखर कारखान्यांनी ऊस गाळप करून ३-४ महिने झाले तरी शेतकऱ्यांची ऊस बिले जमा केलेली नाहीत. त्यामुळे ऊस उत्पादक शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. तरी दिनांक १५ मार्च २०२५ पर्यंत जिल्ह्यातील सर्व साखर कारखान्यांना ऊसबिले करण्यास साखर आयुक्तानी भाग पाडावे. अन्यथा संघटनेच्या वतीनेकार्यालयासमोर दिनांक १७ मार्च २०२५ पासून बेमुदत आंदोलन करण्यात येईल. असे निवेदन प्रादेशिक साखर सह संचालक प्रकाश अष्टेकर यांना आज स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे वतीने दिले. यावेळी युवा जिल्हा अध्यक्ष विजय रणदिवे, शहाजी सोमवंशी, मोहसीन बिराजदार, राहुल बिराजदार, मोहसीन यांच्या सह शेतकरी उपस्थित होते.

## बुलडाणा येथे पाच दिवसीय पशुपालन प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.११, बुलडाणा :** महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र व जिल्हा उद्योग केंद्रामार्फत उद्योग, व्यवसाय सुरु करु इच्छिणाऱ्या सुशिक्षित बेरोजगार युवक व युवतींसाठी बुलडाणा येथे शेळीपालन, कुक्कुट पालन, गाय, म्हैस पालन प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हे प्रशिक्षण दिनांक २४ ते २८ मार्च २०२५ या पाच दिवसांच्या कालावधीत होणार आहे. या प्रशिक्षणाचा मुख्य उद्देश हा सुशिक्षित बेरोजगार यांनी तंत्रशुद्ध प्रशिक्षण घेऊन स्वत:चा उद्योग व्यवसाय सुरु करावा हा आहे. या प्रशिक्षणात शेळीपालन, कुक्कुट आणि गाय म्हैस पालनाचे तंत्र व प्रकार, त्यांच्या जाती, लसीकरण, संशोधन, रोग व लक्षणे, खाद्य निर्मिती व चाऱ्याचे प्रकार व उद्योग सुरु करण्यासाठी संपूर्ण सहकार्य केले जाणार आहे. त्यासोबत उद्योजकता विकास, उद्योग संधी मार्गदर्शन, शासकीय योजनाची माहितीचे मार्गदर्शन या प्रशिक्षणात तज्ञ व्यक्ती करणार आहे.

प्रशिक्षणात प्रवेश घेऊ इच्छिणारा उमेदवार हा किमान ५वी पास, वय १८ ते ५० वर्षे असावे. प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण केल्यानंतर प्रमाणपत्र दिल्या जाईल. प्रशिक्षणासाठी नोंदणी प्रक्रिया सुरु झाली असून त्यासाठी दि. २४ मार्चपर्यंत कार्यालयीन वेळेत गणेश गुप्ता प्रकल्प अधिकारी, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, तहसील कार्यालय जवळ, चिखली रोड, बुलडाणा यांच्याशी संपर्क साधावा. याशिवाय त्यांना ८२७५०९३२०१/९०११५७८८५४ या भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा, असे आवाहन महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राचे विभागीय अधिकारी किशोर अंभोरे यांनी केले आहे.

## गुहागर आगाराला मिळणार १५ नव्या बसेस; शिवाई, शिवनेरी सारख्या नव्या गाड्या द्याव्यात...

**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.११ मुंबई :** गुहागर आगारात असणाऱ्या बसेस या खुप जुन्या असून गेली १०-१२ वर्ष या आगारासाठी नवीन बसेस पुरविण्यात आलेल्या नाहीत. सद्या गुहागर आगारात असणाऱ्या बसेस या खुप जुन्या झाल्या असून त्या वारंवार नादुरुस्त होतात.

त्यामुळे प्रवाशांची गैरसोय होते. अनेक बसेस गळक्या असून पावसाळ्यात प्रवाशांची मोठी गैरसोय होते. तात्पुरती डागडुजी करून प्रवाशांची गरज भागवली जाते. हे लक्षात घेऊन गुहागर आगाराला १५ नव्या गाड्या उपलब्ध करून द्याव्यात, या मागणीसाठी शिवसेना नेते, गुहागर म तदारसंघाचे आमदार भास्करराव जाधव यांनी आज राज्याचे परिवहन मंत्री ना. प्रताप सरनाईक यांची भेट घेतली. यासंबंधीचे पत्र आमदार जाधव यांनी देताच ना. सरनाईक यांनी ही मागणी मान्य करून तत्काळ संबंधितांना निर्दे श दिले.



मुंबईत सुरू असलेल्या विधानसभेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशन काळात आज आमदार जाधव यांनी ना. सरनाईक यांची भेट घेतली. त्यावेळी रत्नागिरी जिल्ह्यातील अनेक वर्षांपासून सेवेत असलेल्या आणि जुन्या झालेल्या वातानुकूलित शिवशाही बस बंद करून शिवाई, शिवनेरी यासारख्या नव्या गाड्या द्याव्यात, अशीही मागणी त्यांनी यावेळी केली. तीदेखील ना. सरनाईक यांनी मान्य केली.

### भगव्या चौकाचे छत्रपती संभाजी महाराज चौक नामांकरण करण्याची मागणी

**अक्षराज : अनंत बोरसे**

**दि.११, शहापूर (ठाणे) :** शहापूर शहरामधील भगवा चौकाचे नामकरण करावे. अशी मागणी नगरसेव रजनी संतोष शिंदे यांनी केली आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांनी घालून दिलेल्या रयतेच्या सेवेचा वसा छत्रपती संभाजी महाराज सक्षमपणे आणि धिरोदात्तपणे सांभाळला. छत्रपती संभाजी महाराज यांच्या बलिदानाचा इतिहास सर्वश्रुत आहे. येणाऱ्या भावी पिढीला महाराजांचा आदर्श प्रेरणादायी ठरावा, स्फूर्ती मिळावी. यासाठी ही मागणी करण्यात आली आहे. मंगळवार, दिनांक ११ मार्च २०२५ रोजी धर्मवीर स्वराज रक्षक छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीचे निमित्त साधून नगरसेविका रजनी शिंदे यांनी मागणीचे लेखी निवेदन मुख्य अधिकारी, नगरपंचायत शहापूर यांना दिले. याबाबत नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष, सर्व नगरसेवक यांनी पाठपुरावा करावा. असे आवाहन करण्यात आले आहे.

## मरणानंतर सरणावरही अंधार! गाडीच्या हेडलाईटच्या उजेडात अंत्यसंस्कार करण्याची नामुष्की

**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.११, कुंडलवाडी :** कुंडलवाडी येथील नागणी रोड स्मशानभूमीत अंत्यविधीच्या ठिकाणी पथदिवेच नाहीत. त्यामुळे याठिकाणी अंत्यविधीसाठी येणाऱ्या नागरीकांना चक्क गाडीच्या व मोबाईल टॉर्चच्या उजेडात अंत्यसंस्कार करण्याची वेळ ओढावली आहे. दरम्यान, या स्मशानभूमीत पथदिव्यांची व्यवस्था करण्याची मागणी नागरिक आणि नातेवाईकांकडून करण्यात येत आहे. या स्मशानभूमीकडे पालिका प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे. नुकत्याच निधन झालेल्या व्यक्तीवर या स्मशानभूम ीत अंधारातच अंत्यसंस्कार करावे लागल्याने नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. शहरातील विविध समस्यांचा उद्रेक आता थेट स्मशानभूम ीपर्यंत पोहोचला आहे. रात्री अंत्यसंस्कार करताना चार चाकी वाहने उभे करून त्यांच्या हेडलाईटचा प्रकाशाचा आसरा मोबाईल टॉर्च घेण्याची वेळ मृतांच्या




नातेवाईकावर आली आहे. पालिकेने या स्मशानभूमीत हायमास्ट दिवे त्वरित बसून देऊन नागरिकांची सोय करून द्यावी. परिणामी मृत्यू झाल्यानंतर स्मशानभूमीत अंत्यविधीसाठी मयत झालेल्या व्यक्तींच्या कुटुंबियांना अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. सोमवारी संध्याकाळी परिसरातील एक व्यक्तीच्या अंत्यविधीसाठी गेलेल्या कुटुंबीयांना याचाच मनस्ताप सहन करावा लागला. या कुटुंबातील नागरिकांनी गाडीच्या बॅटरीच्या उजेडात अंत्यविधी उरकावे लागत असल्याने अंत्यसंस्कारासाठी आलेले आप्तेष्ट, शहरवासी पालिकेच्या दुर्लक्षा बद्दल कमालीची हाताश भावना व्यक्त केली.

# गंभीर आजार टाळण्यासाठी मूत्रपिंडाची वेळीच तपासणी करा

## जिल्हा आरोग्य यंत्रणेचे आवाहन

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.११, अकोला :** जागतिक मूत्रपिंड दिवस हा जगभर मार्च महिन्याच्या दुसऱ्या गुरुवारी साजरा केला जातो. मूत्रपिंड (किडनी) हा शरीरातील महत्त्वाचा अवयव असून, त्याची योग्य ती काळजी न घेतल्याने आजारांचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे नागरिकांनी योग्य काळजी व आवश्यक तपासणी करून घेण्याचे आवाहन जिल्हा आरोग्य यंत्रणेतर्फे करण्यात आले आहे. समाजात याविषयी जागृती करण्यासाठी हा दिवस जागतिक पातळीवर साजरा केला जातो. मूत्रपिंड विकाराची लक्षणे – उच्च रक्तदाब, थकवा, गडद रंगाचे मूत्र, फेसाळ लघवी, लघवीची वारंवारिता किंवा प्रमाण बदलणे, स्नायूंना आकुंचन, त्वचेला खाज सुटणे किंवा कोरडी होणे, सूज, पाठदुखी, वारंवार होणारे संक्रमण, यकृत किंवा स्वादुपिंड यासारख्या शरीराच्या इतर भागात गाठी येणे, ऐकण्याची किंवा दृष्टीची समस्या, फुफ्फुसांचे नुकसान ज्यामुळे खोकल्यातून रक्त येऊ शकते, जीभ वाढणे, सहज जखम होणे किंवा डोळ्यांभोवती जांभळे



ठिपके येणे. भूक न लागणे आदी विकाराची लक्षणे आहेत.

**मूत्रपिंडाचे कार्य व महत्व -**

मूत्रपिंडे शरीरातील पाण्याचा व क्षारांचा समतोल राखण्याचे काम करतात. तसेच शरीरातील हजारो विषारी घटक शरीराबाहेर काढण्यासह रक्तदाब नियंत्रण, व्हिटॅमिन डीची निर्मिती, लाल रक्त पेशी वाढवण्याचे काम ही करत असतात. व्हिटॅमिन डी मुळे हाडांना मजबुती मिळते.

**मूत्रपिंड निरोगी ठेवण्यासाठी खबरदारीचे उपाय -**

निरोगी जीवनशैलीसाठी नियमित व्यायाम नियंत्रित वजन, रक्तातील साखरेची पातळी निरोगी ठेवा, रक्तदाबाचे निरीक्षण करा, निरोगी आहार आणि वजन नियंत्रित राखा, भरपूर द्रव पिऊन हायड्रेटेड रहा, दररोज किमान ३ लिटर पाणी प्यावे. धूम्रपान टाळा. जास्त प्रमाणात वेदनाशामक औषधे घेऊ नका, मूत्रपिंड तपासणी करून घ्यावी.

**आहारात खालील पदार्थांचा समावेश करा -**

बेरी, स्ट्रॉबेरी, ब्लूबेरी, पालक आणि काळे यासारख्या पालेभाज्या, खाऱ्या किंवा गोड्या पाण्यातील मासे, लसूण, तपकिरी तांदूळ, संपूर्ण गव्हाची ब्रेड आणि क्विनोआ यांसारखे संपूर्ण फायबर धान्य, सफरचंद, फुलकोबी, लाल बेल मिरची. दिवसभर पुरेसे पाणी प्यावे. वेळेत मूत्रपिंड तपासणी करून घेउन पुढील गुंतागुंत टाळावी, असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.बळीराम गाढवे यांनी केले आहे.

# सामाजिक कार्यकर्ता प्रशिक्षण वर्गाच्या सांगता समारंभ, प्रमाणपत्र वितरण सोहळा संपन्न

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१०, मुं.उपनगर :** संकल्प संस्था आयोजित सामाजिक कार्यकर्ता प्रशिक्षण वर्गाच्या सांगता समारंभ व प्रमाणपत्र वितरण सोहळा नुकताच पंतवालावलकर स्कुल नेहरू नगर कुर्ला (पूर्व) या ठिकाणी मोठ्या उत्साहात यशस्वीरित्या संपन्न झाला. सामाजिक क्षेत्रातील कार्य करीत असलेल्या तसेच समाज कार्य करण्याची आवड असणारे सामाजिक कार्यकर्ता प्रशिक्षण वर्ग १९ आठवड्याचे घेण्यात आले होते.या प्रशिक्षणामध्ये समाज कार्य म्हणजे काय, समाज कार्याचे महत्त्व नेतृत्व गुण, संवाद कौशल्य गट कार्य प्रचार प्रसिद्धी माध्यमे समाज कार्यकर्त्यांची भूमिका आणि विविध सामाजिक समस्या अशा ४९ विषयावर तज्ञ व्यक्ती कडून प्रशिक्षण घेण्यात आले होते. तसेच चार शनिवार विविध संस्था संघटना आणि शासकीय कार्यालया मध्ये शैक्षणिक भेट आयोजित करण्यात आली होती. दोन दिवसीय निवासी शिबिर देखील घेण्यात आले होत. त्यामध्ये व्यक्तिमत्व विकास व स्व.परिचय याबद्दल मार्गदर्शन करण्यात आले.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे इथेल डिसूझा लोक सेवा संगम संचालिका, सिने नाट्य अभिनेत्री अमृता उत्तरावर श्रीदेवी लोंढे ट्रान्सजेंडर सामाजिक कार्यकर्त्या, सत्येंद्र सामंत सचिव महाराष्ट्र विद्या विकास मंडळ कुर्ला विनोद हिवाळे संस्थापकीय अध्यक्ष संकल्प संस्था, कार्यक्रमाचे समन्वयक सविता हेंडवे, वनिता सावंत यांचा उपस्थितीत संपन्न झाला. कार्यक्रमाचे सुरुवात सर्व प्रथम दीप प्रज्वलन करून आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पुष्पगुच्छ अर्पण करून स्वागत गीत आणि सामूहिक उद्देशिके चे वाचन करुन करण्यात आले. वनिता सावंत यांनी उपस्थित पाहुणे यांचे अल्प परिचय करून दिला. कार्यक्रमाची प्रस्तावना कार्यक्रमाच्या समन्वयक सविता हेंडवे फार सरळ मोजक्या शब्दात मांडणी केली.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुनील कदम आणि नेहा सावंत यांनी उत्कृष्ट प्रकारे केले. सर्व प्रशिक्षणार्थींनी या प्रशिक्षणा दरम्यान आपले अनुभव काय होते काय शिकायला मिळाले काही अडचणी असतांना देखील प्रशिक्षण कसे




यशस्वी पूर्ण केले तसेच भविष्यातल्या त्यांच्या वाटचाल कशी असेल मनोगताचा माध्यमातून सांगितले. उपस्थित पाहुण्यांचा हस्ते सर्व प्रशिक्षणार्थींना त्यांनी १९ आठवड्यांचे सामाजिक कार्यकर्ता प्रशिक्षण वर्ग यशस्वीरित्या पुर्ण केल्याबद्दल प्रमाणपत्र देऊन त्यांना गौरवण्यात आले. उपस्थित मान्यवरांचा हस्ते विशेषता निवासी शिबिरा मध्ये ग्रुप ऍक्टिव्हिटीज च्या माध्यमातून स्पर्धा घेण्यात आल्या होत्या उत्कृष्ट कामगिरी केल्या बद्दल सन्मान चिन्ह देऊन गौरवण्यात आले. स्वागत अध्यक्ष विनोद हिवाळे यांनी सामाजिक कार्यकर्ता यांचे भूमिका आणि भविष्यातले कार्य कसे असावे याबद्दल मार्गदर्शन केले.

प्रमुख पाहुणे यांनी आपल्या भाषणामध्ये सर्व प्रशिक्षणार्थींना शुभेच्छा देऊन भविष्यासाठी महत्त्वाच्या मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन निलोफर शेख यांनी केले. विशेष आभार वर्षाताई विद्या विलास, विद्या पाटेकर, डॉ.संतोष कांबळे, आदेश पगारे सुजाता सावंत, स्वप्निल जाधव, सुनीता चिकणे शिवाजी नगर पोलीस स्टेशन, जनजागृती विद्यार्थी संघ, लोकमान्य तिलक सामान्य रुग्णालय सायन, महाराष्ट्र नशा बंदी मंडळ समतोल फाउंडेशन, युसुफ मेहर अली सेंटर, प्रिंटिंग आणि इलेक्ट्रॉनिक मीडिया विशेष सहकार्य दिपा गमरे राजेंद्र कांबळे सूर्यकांत चव्हाण यांचे लाभले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाचा समारोप करण्यात आले.

# शीव रुग्णालयातील धक्कादायक प्रकार ! अत्यवस्थ रुग्ण २४ तास उपचाराविना

उद्धट डॉक्टरांमुळे मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयांची प्रतिमा खराब होते. डॉक्टरांच्या आठमुठ्या भूमिकेमुळे रुग्णाच्या जीवावर बेतण्याची शक्यता होती. त्यामुळे या डॉक्टरांवर कठोर कारवाई करावी.

**– विष्णू कटके**

जीव वाचवणारे डॉक्टर अशी भूमिका घेत असतील तर ते योग्य नाही. मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयांवर विश्वास असल्यानेच लोक उपचारासाठी येत आहेत. मात्र डॉक्टरांनी त्यांना दाखल करण्यास नकार देणे हे योग्य नाही. डॉक्टरांच्या आठमुठ्या भूमिकेमुळे रुग्णाचा जीव जाऊ शकला असता. या प्रकरणी पालिका आयुक्त भुषण गगराणी यांनी कठोर कारवाई करावी.

**– संजय पाटील, खासदार, ईशान्य मुंबई**

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.११, मुंबई :** 'खासगी रुग्णालयातील रुग्णांना दाखल करून घ्यायचे नाही' अशी आडमुठी भूमिका घेत शीव रुग्णालयातील ट्रॉमा केअरमधील डॉक्टरने सोलापूरहून गंभीर अवस्थेत आणलेल्या ८७ वर्षीय रुग्णाला दाखल करून घेण्यास नकार दिला. त्यामुळे तब्बल २४ तास स्ट्रेचरवरच असलेला रुग्ण उपचाराची वाट पाहत होता. उपचारासाठी नातेवाईक विनवण्या करीत होते, मात्र डॉक्टराला पाझर फुटला नाही. अखेर रुग्णालयाचे अधिष्ठाता मोहन जोशी आणि खासदार संजय पाटील यांच्या सूचनेनंतर रुग्णाला दाखल करण्याचा निर्णय घेण्यात आला. मात्र त्यानंतरही रुग्णाला दुसऱ्या दिवशी रुग्णकक्षामध्ये दाखल करून उपचार सुरू करण्यात आले.

सोलापूर येथील माळशिरस तालुक्यात राहणारे बाळू कटके (८७) यांचा ११ फेब्रुवारी रोजी अपघात झाला. त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने त्यांना अश्विनी रुग्णालयात दाखल करण्यात



आले. मात्र अतिदक्षता विभागात २३ दिवस उपचार घेतल्यानंतरही प्रकृतीत सुधारणा नसल्याने मुंबई महानगरपालिकेमध्ये कामाला असलेल्या त्यांचा मुलगा विष्णू कटके यांनी त्यांना शीव रुग्णालयात आणण्याचा निर्णय घेतला. ७ मार्च रोजी बाळू कटके यांना मोबाइल व्हॅनमधून सहा तास प्रवास करून सकाळी ११ वाजता शीव रुग्णालयात आणले. त्यावेळी आपत्कालिन विभागामध्ये कर्तव्यावर असलेल्या डॉक्टरने त्यांना आतमध्ये घेण्यास नकार दिला. तसेच ट्रॉमा केअर विभागातील डॉक्टरनेही खासगी रुग्णालयातील रुग्णांना दाखल करून घ्यायचे नाही, असे वरिष्ठांचा आदेश असल्याचे सांगत कटके यांना दाखल करून घेण्यास नकार दिला. त्याचबरोबर रुग्ण ८७ वर्षांचे असून, त्यांची वाचण्याची काहीच शाश्वती नाही. तुम्हाला माझी कुठे तक्रार करायची तर करा, मला काहीच फरक पडत नसल्याचे त्या डॉक्टरने उद्धटपणे रुग्णांच्या नातेवाईकांना सांगितले. त्यानंतर शस्त्रक्रिया विभागाच्या डॉक्टरने सुद्धा हीच भूमिका घेतली. या वादात सहा तास निघून गेले. रुग्णाला दाखल करून घेण्यासाठी बाळू कटके यांचा मुलगा विष्णू कटके डॉक्टरांना विनवणी करत होते. मात्र त्यांना पाझर फुटला नाही. विष्णू कटके हे मुंबई महानगरपालिकेतील कर्मचारी असल्याने त्यांनी ओळखीच्या अनेकांना मदतीसाठी फोन केला. अखेर त्यांनी खासदार संजय पाटील व शीव रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. मोहन जोशी यांची भेट घेतली. त्यावर ट्रॉमा विभागातील संबंधित डॉक्टरने अधिष्ठात्यांनी रुग्णाला दाखल करण्यासंदर्भात लेखी दिले तरच दाखल करून असे सांगितले. यावर अधिष्ठात्यांनी दाखल करून घेण्याबाबत लेखी देण्याची तयारी दाखवल्यानंतर सायंकाळी ६.३० वाजता बाळू कटके यांना रुग्णालयात दाखल करून घेण्याची तयारी दर्शवली. मात्र त्यानंतर वेळकाढूपणा करण्यासाठी रुग्णाचे केसपेपर वारंवार तपासले जात होते. वरिष्ठ डॉक्टरांना पाठविले जात होते. मात्र रुग्णाला रुग्णालयात दाखल करून घेण्याऐवजी स्ट्रेचरवरच ठेवले होते. दुसऱ्या दिवशी सकाळी १० वाजता कटके यांना रुग्णकक्ष ४१ मध्ये दाखल करण्यात आले. तोपर्यंत तब्बल २४ तास रुग्ण स्ट्रेचरवरच होते. ट्रॉमा केअरमधील डॉक्टरने हे जाणीवपूर्वक केल्याचा आरोप कटके यांच्या नातेवाईकांनी केला. रुग्णालयातील डॉक्टरकडून त्यांच्या उपचाराकडे दुर्लक्ष केले जात असून, बाबांची प्रकृती गंभीर झाल्याने १० मार्च रोजी दुपारी त्यांना अतिदक्षता विभागात हलविण्यात आल्याचे विष्णू कटके यांनी सांगितले.

# थोडक्यात

## १२ वर्षीय तनय लाडचा जलतरण कामगिरीबद्दल आयुक्तांच्या हस्ते सत्कार

**अक्षराज : जे.के.पोळ**




**दि.११, पनवेल :** सध्या कामोठे येथे राहणारा १२ वर्षीय पनवेलचा रहिवासी असलेला महाडचा १२ वर्षीय तनय तुषार लाड याने गेटवे ऑफ इंडिया ते अटल सेतू (१७ किमी) हे अंतर केवळ २ तास २६ मिनिटांत पार करत सर्वात वेगवान जलतरणपटू होण्याचा मान मिळवला आहे. या अभूतपूर्व जलतरण कामगिरी करून त्याने एक नवा विक्रम प्रस्थापित केला आहे. या जलतरण कामगिरीबद्दल आयुक्त मंगेश चितळे यांच्या हस्ते तनय लाडचासत्कार मंगळवार, दिनांक ११ मार्च २०२५ रोजी पालिका मुख्यालयात करण्यात आला. आई वडिलांच्या मार्गदर्शनाबरोरबच त्याच्या या कामगिरीत प्रशिक्षकांचा मोलाचा सहभाग लाभला आहे. पलावा येथील प्रसिद्ध जलतरणपटू आणि मार्गदर्शक रूपाली रेपाळे व अनिरुद्ध महाडिक यांच्या मार्गदर्शनाखाली तनय प्रशिक्षण घेत आहे. तनयच्या या विक्रमी कामगिरीमुळे त्याच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत असून त्याच्या कुटुंबीयांबरोबरच प्रशिक्षक, मित्र मंडळी आणि संपूर्ण शाळेतील शिक्षक-विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.तनयने ०२ मार्च २०२५ रोजी सकाळी ८.४६ वाजता गेटवे ऑफ इंडिया येथून अरबी समुद्रात उडी घेतली आणि भरतीचे लहरी प्रवाह, वाऱ्याचा जोर आणि हवामानाच्या स्थितींशी झुंज देत हा लाटांवरचा खडतर प्रवास ११.१४ वाजता अटल बिहारी वाजपेयी सागरी सेतु येथे पूर्ण केला. त्याने एक नवीन विक्रम प्रस्थापित केला. त्याच्या या अपूर्व यशामुळे तो जलतरण क्षेत्रात एक नवीन प्रेरणादायी उदाहरण बनला आहे.

तनय सध्या न्यू होरायझन पब्लिक स्कूल, पनवेल येथे इयत्ता सहावीत शिक्षण घेत आहे. तसेच याआधी २०२४ मध्ये त्याने थायलंडमध्ये ओशियन मॅन स्पर्धेत कांस्यपदक, संकरॉक ते गेटवे, पेरियार कोची केरळ, विजयदुर्ग, रंकाळा कोल्हापूर येथे रौप्यपदक आणि मालवण, पोरबंदर स्पर्धेत सहभाग घेऊन आपल्या जलतरण कौशल्यांचे शानदार प्रदर्शन केले होते. खुल्या समुद्रात स्विमिंग हा अत्यंत कठीण व धाडसी क्रीडा प्रकार आहे.

समुद्राच्या अनिश्चित हवामान आणि जलचरांचा सामना करत स्पर्धक प्रत्येक क्षणी जिंकण्याच्या जिद्दीने पोहत असतो. तनयने या आव्हानांना समर्थपणे तोंड दिले. त्याच्या या यशामागे त्याची वयाच्या सहाव्या वर्षांपासूनची कठोर मेहनत, मानसिक तयारी, कठोर परिश्रम, नियमित सरावासाठी रोज पनवेल ते पलावा-डोंबिवली प्रवास आणि आत्मविश्वास याच्या जोरावर त्याने हे यश संपादन केले आहे. त्याने आपले कौशल्य, मेहनत आणि चिकाटी यांचे उत्तम उदाहरण सादर केले आहे. एका सर्वसामान्य जलतरणपटूचे विशेष गुण ओळखून त्यांना सर्व कसोटीत उत्तीर्ण करणे. यामध्ये रूपाली रेपाळे आणि अनिरुद्ध महाडिक यांचे योगदान उल्लेखनीय आहे.

## मातंग समाजाच्या अस्मितेसाठी आत्मदहनाचा इशारा

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.११, मुदखेड (नांदेड) :** मातंग समाजाच्या विविध मागण्या संदर्भात तसेच उमरी चौकातील व्यापारी संकुलास साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे नाव देण्यासाठी एल्गार पुकारण्यात आला असून अस्मितेसाठी आत्मदहनाचा इशारा लेखी निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी यांना देण्यात आला. मुदखेड शहरात नगरपरिषदेच्या वतीने स्वतंत्र व्यापारी संकुल उभारण्यात आले आहे. परंतु गेल्या अनेक वर्षांपासून व्यापारी संकुल हस्तांतरित करण्यात आलेले नाही. या संदर्भात व्यापारी संकुलास साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचे नाव देण्यासाठी लोकशाही मार्गाने सन २०२१ मध्ये आमरण उपोषणही करण्यात आले होते. या उपोषणास शहरातील सर्व सामाजिक, राजकीय संघटनेनी पाठिंबा दिला होता. यानंतर आश्वासन देण्यात आले होते. तत्कालीन मुख्याधिकारी यांनी उपोषणाची दखल घेऊन नाव देण्याचा ठराव संमत केला होता. परंतु याबाबत कोणताही निर्णय झालेला नाही. मातंग समाजाच्या विविध प्रमुख मागण्या केल्या नगरपरिषद हेतू पुरस्कर दुर्लक्ष करीत आहे. जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आलेल्या लेखी निवेदनात तत्कालीन मुख्याधिकारी यांनी दिलेल्या आश्वासनाप्रमाणे व्यापारी संकुलनास नाव देणे, पिण्याच्या पाण्याचे धोरण अंमलात आणणे, साठे नगर घरकुल धारकांचा निधी वितरित करणे, मातंग समाजासाठी व्यापारी संकुलनातील तीन गाळे आरक्षित ठेवणे, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे पुतळ्याची १०० फूट जागा नगरपरिषद अभिलेखात नोंद घेऊन नमुना नंबर आठची प्रत देण्यात यावी.

या प्रमुख मागण्यासाठी मातंग समाजाच्यावतीने एल्गार पुकारण्यात आला आहे. याबाबत संबंधित प्रशासनाने दखल न घेतल्यास तसेच १५ दिवसात न्याय न मिळाल्यास आत्मदहन करण्याचा इशारा शहर युवा काँग्रेसचे सहचटणीस आकाश सोनटक्के यांनी दिला आहे. यासंदर्भात मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, लोकसभा संसद नांदेड, गृहमंत्री, पोलीस महासंचालक, विशेष पोलीस महानिरीक्षक, पोलीस अधीक्षक, पोलीस निरीक्षक मुदखेड, मुख्याधिकारी नगर परिषद मुदखेड यांना कारवाईस्तव प्रत देण्यात आली आहे.

## ई-चलानद्वारे दंडात्मक रकमेचा ऑनलाइन पद्धतीने भरणा करावा

**अक्षराज : जे. के. पोळ**




**दि.११, ठाणे :** प्रादेशिक परिवहन कार्यालय, ठाणे कार्यालयाद्वारे दि.०८ मार्च २०२५ पासून एआय तंत्रज्ञानाचा वापर करून मोटार वाहन थकीत कर असलेल्या वाहनांच्या मालकांना व वाहन तपासणीमध्ये दोषी आढळून आलेल्या ई-चलान द्वारे दंडात्मक रकमेचा भरणा प्रलंबित असलेल्या वाहन मालकांना एआय रिकव्हरी असिसटंस द्वारे त्यांच्या नोंदणीकृत मोबाईलवर कॉल करून parivartan.gov.in या संकेत स्थळावरून ऑनलाईन पद्धतीने भरणा करण्या बाबत सूचित करण्यात आले आहे.

तसेच याद्वारे वाहनांची कागदपत्रे जसे की, इन्शुरन्स, फिटनेस, पीयुसी, यांची वैधता समाप्त झालेल्या वाहन मालकांना देखील वाहनांची कागदपत्रे वैध करण्याबाबत अवगत केले जात आहे. वाहन मालकांनी कर व दंड भरण्यासाठी आवश्यकता भासल्यास प्रादेशिक परिवहन कार्यालय, ठाणे कार्यालयास संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.